मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शनिवार, दि. 07 मार्च 2026 | पान- 1


# पुणे जिल्हा भविष्यातील 'ग्रोथ हब' : आमदार शंकर जगताप

## राज्याचा अर्थसंकल्प विकासाचा सर्वसमावेशक 'रोडमॅप'; 5 दशलक्ष नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आजचा दिवस महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रवासातील एक मैलाचा दगड ठरणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला अर्थसंकल्प म्हणजे केवळ आर्थिक घोषणांचा दस्तऐवज नसून, तो विकसित महाराष्ट्राचा एक व्यापक आराखडा आहे. शाश्वत, सर्व समावेशक, प्रगतशील आणि सुशासन असा विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसत आहे. ज्यामध्ये महापुरुषांचा आदर्श जतन करून विकसित महाराष्ट्राचा रोड मॅप तयार करण्याचा दूरदृष्टीकोन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला आहे. मुंबई महानगराच्या धर्तीवर आता पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर ही शहरे 'ग्रोथ हब' म्हणून नावारूपास येणार आहेत. यामुळे पुणे जिल्हाला



जागतिक पातळीवर एक नवी आणि आधुनिक ओळख प्राप्त होईल," असा विश्वास चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

या अर्थसंकल्पाचे स्वागत करताना आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले की, "महाराष्ट्र आज थेट परकीय गुंतवणुकीत (FDI) देशात अव्वल स्थानावर असून 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' मध्येही राज्याने सुवर्णपदक पटकावले आहे. पुणे हे आधीच उद्योगांचे केंद्र आहे, मात्र आता ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (AVGC) सारख्या अत्याधुनिक क्षेत्रात पुण्याला जागतिक स्तरावर नेण्याचे स्वप्न या अर्थसंकल्पातून साकार होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात मोठे औद्योगिक समूह उभारण्याचा संकल्प राज्याच्या औद्योगिक भरभराटीला नवी दिशा देणारा ठरेल.'इन्वेस्ट महाराष्ट्र' नावाचे एक डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित केले जात आहे, आणि प्रत्येक जिल्ह्यात लघु आणि मध्यम उद्योग केंद्र स्थापन केली जातील. या धोरणामुळे सुमारे ५ दशलक्ष नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा

> "राज्याचा हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक घोषणा नसून, 'विकसित महाराष्ट्राचा' सर्वसमावेशक आराखडा आहे.शाश्वत, सर्व समावेशक, प्रगतशील आणि सुशासन असा विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प आहे. पुण्याला 'ग्रोथ हब' बनवण्याचा संकल्प आणि पायाभूत सुविधांवरील भर जिल्ह्याला जागतिक ओळख मिळवून देईल. शेतकरी कर्जमाफी आणि तीर्थक्षेत्र विकास यातून सरकारने वारकरी संप्रदाय व बळीराजाचा सन्मान केला आहे. ५ दशलक्ष नोकऱ्यांचे उद्दिष्ट युवकांसाठी प्रगतीची नवी कवाडे उघडणारे ठरेल. खऱ्या अर्थाने हा अर्थसंकल्प प्रगत आणि सुशासनाकडे नेणारा गतिमान 'रोडमॅप' आहे."
>
> - शंकर जगताप, आमदार, पिंपरी-चिंचवड

आहे.

"शेतकरी आणि वारकरी संप्रदायासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आमदार जगताप म्हणाले, "बळीराजाला आधार देण्यासाठी सरकारने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. तसेच, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची जन्मभूमी असलेल्या देहू येथील विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्याचा घेतलेला संकल्प हा वारकरी संप्रदायाचा सन्मान करणारा आहे. जलयुक्त शिवार आणि वैरण विकासावर दिलेला भर कृषी क्षेत्राला नवा आयाम देईल.

( उर्वरित पान 2 वर )

# महापौर रवी लांडगे यांना यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार जाहीर

## 12 मार्च रोजी सन्मान सोहळा; डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पिंपरी – चिंचवड विभागाच्या वतीने गुरुवार, दिनांक १२ मार्च २०२६ रोजी दुपारी ठीक ०४:०० वाजता यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.



८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते संपन्न होणाऱ्या या सन्मान सोहळ्याचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य आदर्शगाव संकल्प योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार भूषविणार असून ज्येष्ठ समाजसुधारक पद्मश्री गिरीश प्रभुणे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहील. नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे सोहळ्याचे स्वागताध्यक्ष आहेत.

यापूर्वी, भाऊसाहेब भोईर, संजोग वाघेरे, राजाभाऊ गोलांडे, सुरेश घुले, अनिल भोसले, शांताराम भालेकर, उमा खापरे, सुलभा उबाळे या राजकीय क्षेत्रातील मान्यवरांना यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे पिंपरी चिंचवड विभाग अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी दिली असून या सोहळ्यात राष्ट्रपतींचे धोरणात्मक सल्लागार डॉ. देवानंद शिंदे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी अनिता शिंदे या दांपत्याला यशवंत – वेणू पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

त्याचबरोबर नगरसेविका शिवानी नरळे यांना (वेणूताई चव्हाण युवती पुरस्कार), आर. के. डेव्हलपर्स अँण्ड बिल्डर्सचे संचालक राजाराम मलघे यांना (यशवंतराव चव्हाण उद्योगभूषण पुरस्कार) आणि ब्राईट इंडस्ट्रीजचे संचालक वसंत गायकवाड यांना (यशवंतराव चव्हाण उद्योगविभूषण पुरस्कार) प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. याप्रसंगी श्रमश्री बाजीराव सातपुते 'यशवंतराव इतिहासाचं एक सोनेरी पान' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. नागरिकांनी या सोहळ्याचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुणे मेट्रोपोलिटन रिजनच्या विकासाला शाश्वत गती!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे PMR वर विशेष लक्ष; भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांची प्रतिक्रिया

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प २०२६-२७ सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे मेट्रोपोलिटन रिजन (PMR) वर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी भुयारी मार्ग, उन्नत रस्ते जाळे आणि औद्योगिक व आर्थिक संधी उपलब्ध करून देण्यावर या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे.

भाजपा नेते व आमदार महेश लांडगे यांनी महाराष्ट्रा या विकासात्मक उपाययोजनांचा स्वागत करताना म्हटले आहे की, "महाराष्ट्राचे अर्थसंकल्प २०२६-२७ हा फक्त एक आर्थिक दस्तऐवज नाही, तर 'विकसित महाराष्ट्र 2047' कडे जाणारा रोडमॅप आहे. पुणे-पिंपरी-चिंचवड सारख्या महानगरांना आणि ग्रामीण भागांना समर्पित या धोरणांनी राज्याचा सर्वांगीण विकास सुनिश्चित केला आहे, हे स्पष्ट दिसते.

"पुणे मेट्रोपोलिटन रिजनचा सर्वांगीण विकास हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सुधारणा घडवून आणेल. रोजगार, उद्योग, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण या सर्व क्षेत्रांमध्ये यामुळे गती येईल. मुख्यमंत्री फडणवीस यांचे PMR वर लक्ष हे शहराच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आम्ही या रोडमॅपचा पूर्ण पाठिंबा देतो आणि पुण्याच्या नागरिकांसाठी सर्वोत्तम लाभ सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्नशील राहू. श्रीक्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्र, जगद्गुरू संत तुकाराम महाराज जन्मस्थान देहू विकास आराखडा, भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास, पुणे व पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक सक्षमीकरण, प्रदूषण नियंत्रण, जलस्त्रोत या मुद्यांवर राज्य सरकार शाश्वत दृष्टीकोनातून काम करीत आहे, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.



### पिंपरी-चिंचवडमध्ये होणार अजितदादांचे स्मारक..!

**» राज्यातील विविध औद्योगिक प्रकल्प, महिला व शेतकरी कल्याण, तंत्रज्ञान आणि नवउद्योग प्रोत्साहन, तसेच सामाजिक कल्याण योजनांवरही या अर्थसंकल्पात भर दिला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली म्हणून भव्य स्मारक उभारणे आणि त्यांच्या नावावर गतीमान नागरी सेवा पुरस्कार सुरू करण्याचे घोषणाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अर्थसंकल्पात केली. पिंपरी-चिंचवडमध्ये "अजितसृष्टी व स्मारक" उभारण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने मंजुर केला आहे. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेमुळे त्याला बळ मिळेल, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.**

> **"पुणे मेट्रोपोलिटन रिजनच्या विकासासाठी हा अर्थसंकल्प नवा गतीमान रोडमॅप ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष लक्ष आणि राज्य सरकारच्या प्रयत्नांमुळे, पुणे आणि पिंपरी-चिंचवसह ग्रामीण परिसरातील नागरिकांना रोजगार, उद्योग, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कल्याण या सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वत लाभ मिळेल. या महत्त्वाकांक्षी अर्थसंकल्पाचे आम्ही स्वागत करीत आहोत."**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



# पिंपरी-चिंचवडकरांना अतिरिक्त पाण्यासाठी प्रतीक्षा

## 167 एमएलडी पाणीपुरवठा अद्यापही अधांतरी; 70% काम पूर्ण, उर्वरित 30% साठी नव्या ठेकेदार

**पिंपरी | प्रतिनिधी**




भामा-आसखेड पाणी प्रकल्पाच्या कामाची मुदत संपूनही पिंपरी-चिंचवड शहराला 167 एमएलडी पाणी मिळालेले नाही. वारंवार मुदतवाढ तसेच, तंबी देऊनही कामास वेग मिळत नसल्याने, निष्क्रीय ठेकेदाराचे काम अखेर, थांबवण्यात आले आहे. उर्वरित 30 टक्के काम पूर्ण करण्यासाठी नवीन ठेकेदार नेमण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. परिणामी, शहराला अतिरिक्त स्वच्छ पाणी मिळण्यास विलंब होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

शहराची लोकसंख्या 30 लाखांच्या पुढे गेली आहे. संपूर्ण शहराला गेल्या सव्वासहा वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. शहरातील अनेक भागांत पाणी टंचाईबरोबरच दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींची संख्या महापालिका निवडणुकीनंतर अचानक वाढली आहे. सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकांसह विरोधकही पाण्यावरून संताप व्यक्त करत आहेत. अशा स्थितीत भामा-आसखेड पाणी योजनेचे काम रेंगाळल्याने शहरवासीयांकडून रोष व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणातून महापालिकेसाठी 167 एमएलडी पाणी कोटा आरक्षित आहे. तेथून पाणी आणण्यासाठी धरणाजवळ मौजे वाकी तर्फे वाडा येथे अशुद्ध जलउपसा केंद्रापासून ते तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँकपर्यंत 7.30 किलोमीटर अंतराची 1700 मिलिमीटर व्यासाची मुख्य जलवाहिनी टाकण्यात काम सुरू आहे. ब्रेक प्रेशर टँकपासून चिखली

जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी नेण्यासाठी 18.80 किलोमीटर अंतराची 1400 मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकली जात आहे. भूमिगत जलवाहिनीचे काम एकूण 26.10 किलोमीटर इतके आहे. त्यासाठी 163 कोटी 24 लाख खर्च अपेक्षित आहे. जलवाहिनीचे काम आत्तापर्यंत 70 टक्के इतके झाले आहे. विविध विभागांकडून जागा ताब्यात येण्यास विलंब, शेतकऱ्यांकडून अडवणूक, ठेकेदारांचे संथ गतीने कामआणि इतर तांत्रिक कारणांमुळे तो प्रकल्प मुदतीमध्ये पूर्ण झाला नसल्याचे पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी सांगत आहेत.

# पुणे जिल्हा भविष्यातील 'ग्रोथ हब' : आमदार शंकर जगताप

**( पान 1 वरून )**

"पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडीवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, "शहरातील वाहतुकीचा प्रश्न सोडवण्यासाठी मुंबईच्या धर्तीवर पुण्यातही भुयारी मार्ग (SUBWAY) आणि उन्नत मार्गांचे जाळे उभारले जाणार आहे. पाच ज्योतिर्लिंग क्षेत्रांचा विकास हे या बजेटचे खास वैशिष्ट्य आहे. याशिवाय, सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ३१ सायबर गुन्हे महामंडळ, दिव्यांगांसाठी स्वतंत्र कौशल्य विकास केंद्रे आणि प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेतील महाराष्ट्राची उत्तुंग कामगिरी हे निर्णय राज्याला प्रगत बनवणारे आहेत."आयुष्मान भारत, शिवसृष्टी आणि शहरी आरोग्य आयुक्तालय यांसारख्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आरोग्याची आणि संस्कृतीची जपणूक करणारा हा अर्थसंकल्प 'सर्वसमावेशक विकास' साधणारा असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी नमूद केले.

आमदार शंकर जगताप म्हणाले पुणे जिल्ह्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. यामध्ये पुणे-शिरूर ५३ किमी लांबीच्या उन्नत मार्गासाठी ७,५१४ कोटी रुपये आणि तळेगाव-चाकण २५ किमी उन्नत मार्गासाठी ६,४९९ कोटी रुपयांची मोठी तरतूद करण्यात आली आहे. तसेच, चाकण-शिक्रापूर दरम्यानच्या २८ किमी रस्त्याचे ५,२३२ कोटी रुपये खर्चून सहापदरीकरण करण्यात येणार असून, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान १९२ किमीचा नवीन ग्रीनफील्ड महामार्ग उभारला जाणार आहे, ज्याचा अंदाजित खर्च १४,८८६ कोटी रुपये आहे. हडपसर ते यवत दरम्यानच्या ३१.५० किमी सहापदरी रस्त्यामुळे पुण्याबाहेरील वाहतूक अधिक सुलभ होईल. केवळ शहरेच नव्हे, तर ग्रामीण भागातील १००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना कॉंक्रीट रस्त्यांनी जोडण्यासाठी आशियाई बँकेच्या मदतीने ४,५०० कोटींचा प्रकल्प राबवला जाणार आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. पुणे लोणावळा रेल्वे महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग आणि अटल सेतू यांना जोडणारा उन्नत मार्ग फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# एप्रिलपासून कमी दराच्या निविदा होणार अमान्य !

## एकाच ठेकेदाराला तीनपेक्षा जास्त कामे नाहीत; 1 एप्रिलपासून नवीन धोरण लागू

**पुणे | प्रतिनिधी**

'महापालिकेने निश्चित केलेल्या रकमेपेक्षा कमी दराच्या निविदा आल्यास त्याला मंजुरी दिली जाणार नाही. तसेच, एकाच ठेकेदाराला तीनपेक्षा अधिक कामे मिळणार नाहीत,' असे नवीन धोरण महापालिका तयार करणार आहे. येत्या १ एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी केली जाणार असल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. मात्र, याच वेळी ३३ ते ३५ टक्के कमी दराने आलेल्या प्रशासक काळातील ११ कोटींच्या निविदांना मात्र बैठकीत मंजुरी देण्यात आली.

महापालिकेने ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा ३० ते ४० टक्के कमी दराने काम करण्याची तयारी दाखवून ठेकेदारांकडून कामे घेतली जातात. मात्र, प्रत्यक्षात ही कामे करताना त्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे वारंवार समोर आले आहे. कमी दराने कामे घेतल्याने ती उरकण्याची घाई केली जाते. यामध्ये महापालिकेचेच नुकसान होते.

तसेच, एकाच ठेकेदाराकडे दहा कामे गेल्याने कामांचा दर्जाही राखला जात नाही. या पार्श्वभूमीवर पूर्वगणनपत्रकापेक्षा ३० ते ५० टक्के कमी दराच्या निविदांना येत्या १ एप्रिलनंतर कोणतीही मंजुरी दिली जाणार नाही. यासाठी पालिका प्रशासनाकडून धोरण तयार केले जाणार आहे.




### कमी दराच्या निविदांमुळे कामांच्या दर्जावर परिणाम

» महापालिकेच्या कामांमध्ये कमी दराच्या निविदांमुळे दर्जाहीन कामे होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. अनेक ठेकेदार ३० ते ४० टक्के कमी दराने कामे स्वीकारतात, मात्र प्रत्यक्षात ती घाईघाईने पूर्ण केली जात असल्याने कामांचा दर्जा खालावत असल्याचे दिसून आले आहे. काही ठिकाणी तर काम पूर्ण होण्यापूर्वीच दुरुस्तीची वेळ येते. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याचीही बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर निविदा प्रक्रियेत पारदर्शकता आणि गुणवत्तेला प्राधान्य देण्यासाठी नवीन धोरण तयार करण्यात येत आहे. तसेच एकाच ठेकेदाराकडे जास्त कामे जाणार नाहीत, यासाठी मर्यादा निश्चित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

स्थायी समितीच्या बैठकीत कमी दराने मान्यतेसाठी सर्रासपणे येणाऱ्या निविदा तसेच एकाच ठेकेदाराला मिळणाऱ्या अनेक कामांच्या निविदांवर चर्चा झाल्याची माहिती अध्यक्ष भिमाले यांनी दिली. भिमाले म्हणाले, 'एकाच ठेकेदाराकडे तीनपेक्षा अधिक कामे नसतील, असे धोरण महापालिका प्रशासनाकडून तयार केले जाणार आहे. यामुळे कामाचा दर्जा टिकून राहण्यास मदत होईल. तसेच, एकाच ठेकेदाराकडे सर्व कामे जाऊन त्याच्याकडून होणारी मनमानी कमी होईल. महापालिकेने ठरविलेल्या दरापेक्षा कमी दराने काम करणे संबंधित ठेकेदाराला कसे परवडते याचाही अभ्यास केला जाणार आहे.'

### अकरा कोटींच्या निविदांना मान्यता

» एकीकडे ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा कमी दराच्या निविदांना मान्यता न देण्याचे धोरण पालिका आखत असताना महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत गुरुवारी पूर्वगणनपत्रकापेक्षा चक्क ३३ ते ३६ टक्के कमी दराने आलेल्या ११ कोटी रुपयांच्या निविदांना मान्यता देण्यात आली. शहरातील विविध भागांत ड्रेनेज लाईन टाकणे, समाविष्ट गावांमध्ये पूर परस्थितीच्या अनुषंगाने पावसाळी लाईन आणि कल्व्हर्टची कामे करण्याच्या या निविदा आहेत. 'या निविदा प्रशासक काळातील असल्याने त्यांना मान्यता देण्यात आली. मात्र, यापुढील काळात अशा निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत,' असे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

### निविदा प्रक्रियेत महापालिकेचे नवे धोरण

» पुणे महापालिकेच्या निविदा प्रक्रियेत मोठा बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेने ठरवून दिलेल्या अंदाजित रकमेपेक्षा अत्यंत कमी दराने येणाऱ्या निविदांना मंजुरी न देण्याचे धोरण तयार करण्यात येणार आहे. येत्या १ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार असल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. तसेच एकाच ठेकेदाराला तीनपेक्षा अधिक कामे देऊ नयेत, असा नियमही लागू करण्याचा विचार आहे. यामुळे कामांचा दर्जा सुधारेल आणि ठेकेदारांची मक्तेदारी कमी होईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे.

# कमी वेळेत तक्रारी सोडविणाऱ्यांना मिळणार बक्षीस !

## तक्रारीची ऑनलाइन स्थिती पाहता येणार; महापालिकेच्या रुग्णालयांमध्येही सुविधा वाढविणार : महापौर मंजूषा नागपुरे

**पुणे | प्रतिनिधी**

'महापालिकेकडे केल्या जाणाऱ्या प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्यासाठी 'पीएमसी केअर' ॲपमध्ये आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. महापालिकेबाबत आमदार, खासदार यांच्याकडे केल्या जाणाऱ्या तक्रारींची नोंद महापालिकेकडून घेऊन त्याचे निवारण केले जाईल.

पुणे महापालिकेकडे येणाऱ्या प्रत्येक तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्याची सद्यःस्थिती नागरिकांना पाहता येणार आहे. जे अधिकारी, कर्मचारी कमी वेळेत तक्रार निकाली काढतील त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षीस योजना सुरु केली जाईल,' अशी माहिती महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिली.




'शहरातील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी महापालिकेच्या पाच रुग्णालयांत आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देताना रुग्णालयातील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत,' असे महापौर नागपुरे यांनी सांगितले. महापौरपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर महापौर म्हणून काम करताना असलेल्या आव्हानांची माहिती तसेच गेल्या महिनाभरात जाणवलेल्या समस्यांबाबत नागपुरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

त्यावेळी त्यांनी बेकायदा बांधकामे, चौकांमध्ये तसेच मुख्य रस्त्यांवर लावले जाणारे जाहिरात फलक, वाहतूक कोंडी, अपुऱ्या आरोग्य सेवा याबाबत भूमिका मांडली. महापौर नागपुरे म्हणाल्या, 'महापालिकेच्या वतीने नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवांमध्ये अनेक त्रुटी आहेत. महापालिकेतील आरोग्य व्यवस्था सक्षम नसल्याने खासगी रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी नागरिकांना जावे लागते. यासाठी महापालिकेची पाच रुग्णालये सक्षम केली जाणार असून, त्यामध्ये सर्व अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.'

### महापौर कार्यालयात खासगी कर्मचारी

» महापौर कार्यालयामध्ये वरिष्ठ लिपिक, टंकलेखक, शिपाई असे ८ ते ९ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, महापौर कार्यालयाकडे येणाऱ्या तक्रारी तसेच इतर महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वीय सहाय्यक, सचिव, राजशिष्टाचार अधिकाऱ्यांसह कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यामुळे कामाला गती मिळावी, यासाठी महापौर कार्यालयात खासगी कर्मचारी नेमले जाणार असल्याचे महापौर मंजूषा नागपुरे यांनी स्पष्ट केले. हे कर्मचारी स्वयंसेवक पद्धतीने काम करणार असून, काही कर्मचाऱ्यांचे वेतन स्वतः देणार असल्याचे नागपुरे यांनी सांगितले.

# पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे दौंड-पुरंदरच्या विकासाला वेग

## आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे अर्थकारणाला नवे वळण; शेतकऱ्यांसाठी 'सुगीचे दिवस' येण्याची चिन्हे

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात साकारत असलेल्या छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे संपूर्ण दौंड-पुरंदर तालुक्याच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळणार आहे. राज्य शासनाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे 6 हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले असून, सुमारे 900 हेक्टर क्षेत्राच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग आला आहे.

या पार्श्वभूमीवर परिसरातील शेतजमिनींच्या बाजारभावात मोठी उसळी येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. काही ठिकाणी प्रतिएकर 2 कोटी रुपयांपर्यंत दर मिळू शकतो, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे अनेक वर्षे अल्पभावात असलेल्या जमिनी आता सोन्याच्या मोलाच्या ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.





### खोर गाव विकासाच्या उंबरठ्यावर

» दौंड तालुक्यातील खोर गाव हे विमानतळ हद्दीपासून अगदी जवळ असल्याने या प्रकल्पाचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम येथे दिसून येणार आहे. एकेकाळी बाजारात विचारही न झालेल्या जमिनींना आता गुंतवणूकदारांकडून मागणी वाढू लागली आहे. विमानतळ उभारणीमुळे खोर गावातील शेतकरी वर्गाच्या आर्थिक स्थितीत आमूलाग्र बदल घडण्याची शक्यता आहे. जमीनमूल्यवाढ, बांधकाम व्यवसाय, निवासी प्रकल्प, व्यावसायिक संकुले, गोदामे, हॉटेल्स आणि सेवा क्षेत्रात मोठी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### आर्थिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू

» पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ हा केवळ वाहतूक सुविधा वाढवणारा प्रकल्प नसून, तो संपूर्ण दौंड-पुरंदर परिसराच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. दुष्काळी छाया सहन केलेल्या या भागासाठी हा प्रकल्प विकासाचा नवा अध्याय लिहिणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. खोर गावातील शेतकरी वर्गासाठी हे 'सुगीचे दिवस' सुरू होण्याची चाहूलच मानावी लागेल. एकंदरीत विकासाच्या आकाशात झेप घेणाऱ्या या प्रकल्पामुळे खोर गाव आणि परिसराचा चेहरामोहरा बदलणार हे निश्चित मानले जात आहे.

### लॉजिस्टिक पार्कमुळे औद्योगिक संधी

» आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात लॉजिस्टिक पार्क उभारण्याची योजना प्रस्तावित असून, त्यामध्ये खोर गावाचा काही भाग समाविष्ट होण्याची चिन्हे आहेत. या माध्यमातून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. शेतीपुरता मर्यादित असलेला हा भाग आता औद्योगिक आणि व्यापारी दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरणार आहे.

या पार्श्वभूमीवर परिसरातील शेतजमिनींच्या बाजारभावात मोठी उसळी येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. काही ठिकाणी प्रतिएकर 2 कोटी रुपयांपर्यंत दर मिळू शकतो, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे अनेक वर्षे अल्पभावात असलेल्या जमिनी आता सोन्याच्या मोलाच्या ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.

खोर गावातून जाणारा डोंबेवाडी घाटमार्ग हा विमानतळाकडे जाण्यासाठी अत्यंत जवळचा आणि सोयीचा मार्ग ठरणार आहे. त्यामुळे या मार्गाच्या मजबुतीकरण व रुंदीकरणाच्या 8पान 3 वर

राज्य शासनाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे 6 हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले असून, सुमारे 900 हेक्टर क्षेत्राच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग आला आहे. कामांना प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे. गावातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांनाही वेग येणार आहे.

# उजनी धरण परिसरातील गाळपेरी जमिनींना हात लावू नका : विखे पाटील

## फ्लोटिंग सोलर प्रकल्पावर निर्णय शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच; नोटिसांना स्थगिती देण्याचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरण परिसरातील गाळपेरीच्या जमिनींना कोणत्याही परिस्थितीत हात लावू नये, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच फ्लोटिंग सोलर पॉवर प्रकल्पाबाबत पुढील निर्णय होईल आदी काही महत्त्वपूर्ण निर्णय जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतल्याने उजनी धरणग्रस्तांना मोठा दिलासा मिळाला आहे.



### भाजप शेतकऱ्यांच्या पाठीशी

» शेतकऱ्यांवरील अन्याय सहन केला जाणार नाही. त्यांच्या हक्कांच्या जमिनींचे संरक्षण करण्यासाठी भाजपच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठविला जाईल. आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील, असे म्हणत भाजपनेते प्रदीप गारटकर आणि प्रवीण माने यांनी उजनी प्रश्नावर भाजप व मित्रपक्ष शेतकऱ्यांच्या ठाम पाठीशी उभे असल्याचा विश्वास व्यक्त केला.

उजनी धरण परिसरातील गाळपेरी जमिनी, शेतकऱ्यांना पाठविलेल्या नोटिसा आणि प्रस्तावित प्रकल्पांमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दालनात महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णायक निर्णय घेण्यात आल्याने संबंधित तालुक्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

या वेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार राहुल कुल, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार सदाभाऊ खोत, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, भाजपनेते प्रदीप गारटकर, माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती प्रवीण माने, शेतकरी संघटनेचे नीलेश देवकर, कोयना पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हेमंत धुमाळ तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत इंदापूर, दौंड, कर्जत, माढा आणि करमाळा या तालुक्यांतील अनेक शेतकरी प्रत्यक्षात आपल्या जमिनीची वहिवाट करतात. त्यांना जलसंपदा विभागाकडून नोटिसा पाठविल्याने संभमाचे वातावरण निर्माण झाले होते. यावर मंत्री विखे पाटील यांनी संबंधित कारवाईला तत्काळ स्थगिती देण्याचा निर्णय जाहीर केला.

गाळपेरीच्या जमिनींना कोणत्याही परिस्थितीत हात लावू नये, ज्यांची जमीन अधिग्रहित झाली आहे किंवा जे धरणग्रस्त आहेत त्यांनाच 11 महिन्यांच्या कराराने वहिवाटीसाठी जमीन द्यावी आणि याबाबत पूर्वीच्या जीआरनुसार अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश बैठकीत देण्यात आले.

उजनी धरणालगत प्रस्तावित फ्लोटिंग सोलर पॉवर प्रकल्पाबाबत माहिती सर्वांना देण्यात येईल. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच पुढील निर्णय होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय धरणालगत सुमारे साडेतीनशे हेक्टर पर्यटन प्रकल्पासाठी प्रस्तावित जमीन आहे. या क्षेत्रात काही शेतकरी सध्या शेती करीत आहेत. त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी सविस्तर अहवाल तयार करण्याचे ठरले आहे.

दरम्यान, पाटबंधारे वसाहतीचा प्रश्न सोडविण्यासाठी ती संबंधित ग्रामपंचायतीकडे वर्ग करणे किंवा स्वतंत्र महसुली सजा करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच, धरणग्रस्तांना दिलासा देताना संबंधित सर्व विभागांत समन्वय ठेवण्याच्याही सूचना विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या बैठकीत कळीचे प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाल्याने शेतकऱ्यांच्या संघटित लढ्याला हे यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.